ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 2 | OCTOBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षामार्फत केलेले कार्य

**श्री. संजय बब्रुवान कांबळे**
**गणेश नगर, कुडूवाडी , ता. माढा, जिल्हा सोलापूर.**

***प्रस्तावना :***



श्रमिकाविषयी तळमळ असणारे कम्युनिस्ट विचारसरणीचे गाढे अभ्यासक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी १५ ऑगस्ट १९३६ रोजी 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हा पक्ष केवळ मजूर, कामगार वर्गाच्या कल्याणासाठीच स्थापन केला होता. त्यामुळे त्यांनी पक्षाच्या नावातच 'मजूर' हा शब्द वापरला. त्यांचे असे म्हणणे होते की, मजूर वर्गात सर्वच कामगार आले. त्यात अस्पृश्य वर्गाची त्याचबरोबर कामगार वर्गाची दुःखे नाहीशी करायची असतील, त्यांना आपले हक्क प्राप्त करुन द्यावयाचे असतील तर राज्यकारभारात भाग घेऊन त्यात प्रवेश करुन आपले ध्येय, हक्क प्राप्त करुन घेतले पाहिजे. २२ ऑगस्ट १९३६ च्या जनता या मुखपत्राच्या संपादकीयात त्यांनी म्हटले की, अस्पृश्यता निवारण्याच्या लढ्याचे बाह्य स्वरुप जरी जातीनिष्ठ वाटत असले तरी तो लढा आर्थिक आहे आणि या आर्थिक लढ्यात स्पृश्य आणि अस्पृश्य शेतकरी-कामकरी वर्गाचे हितसंबंध एकजीव आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे असे मत होते की, "गरिबांचा पक्ष गरिबांनीच चालवला पाहिजे." म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या स्वतंत्र मजूर पक्षात कायस्थ, बहुजन समाज, दुर्बल मराठी वर्ग यांचा समावेश केला. डॉ.बाबासाहेब आबेडकरांनी अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, कामगारांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी हा पक्ष स्थापन केला.

१७ ऑगस्ट १९३७ रोजी खरे मंत्रीमंडळाने संप व टाळेबंदी यांना प्रतिबंध करता यावा या उद्देशाने विधेयक तयार केले. १५ सप्टेंबर १९३८ रोजी विधानसभेमध्ये विधेयकावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरंनी घणाघाती हल्ला चढवला. सदर मांडलेल्या विधेयकामुळे संप करणे हा गुन्हा ठरवून कॉग्रेस सरकारने कामगारांवर गुलामगिरीच लादली आहे. अशा शब्दात विधेयकाचा धिक्कार करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी विधेयकास कामगारांचे नागरीक स्वातंत्र्य हिरावून घेणारा कायदा अशी टिका केली. १९ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर १९३८ या काळात या विधेयकावर चर्चा करण्यात आली. या दरम्यान रविवारी १६ ऑक्टोबर १९३८ रोजी सायंकाळी साडेसहा वाजता मुंबईतील प्रमुख कामगार संस्थेच्या विद्यमाने विशेषतः स्वतंत्र मजूर पक्ष व ट्रेड युनियन काँग्रेसतर्फे कामगारांनी एक संयुक्त परिषद परळ कामगार मैदानावर भरली होती.[१] विधानमंडळातील बहुमताच्या जोरावर काँग्रेस पक्षाने सदर कामगारांवर अन्याय करणारे विधेयक सभागृहात सहज मंजूर करुन घेतील त्यामुळे त्यांना रोखण्यासाठी १७ ऑक्टोबर १९३८ रोजी एक दिवसाचा सार्वत्रिक संप करण्याचा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कम्युनिष्ट नेत्यांनी ही मांडला. ७ नोव्हेंबर १९३८ हा दिवस सार्वत्रिक संपाचा निश्चीत करण्यात आला. काही दिवसापूर्वी म्हणजे १२ व १३ फेब्रुवारी १९३८ रोजी मनमाड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य जी.आय.पी.रेल्वे कामगारांची एक मोठी परिषद भरवली होती. या परिषदेस जवळ-जवळ २०००० कामगार उपस्थित होते.[२] डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव याचा अभाव म्हणजे ब्राम्हणशाही. ब्राम्हणशाही सर्वदर्शी असल्यामुळे आर्थिक क्षेत्रातील संधी वरही तिचे मोठ्या प्रमाणात परिणात होतात. कामगारांची एकजूट करावयाची असेल तर कामगारांनी ब्राम्हणशाहीचे निर्मुलन केले पाहिजे.

७ नोव्हेंबर १९३८ या दिवसाचा सार्वत्रिक संप लढण्यापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई महापालिकेच्या जलनिःसारण खात्यातील कामगारांचे काही प्रश्न सोडविले. रविवारी काम करण्यास नकार दिल्याबद्दल दोन कामगारांना निलंबित करण्यात आले होते. त्याविरुद्ध ७ एप्रिल १९३८ रोजी कामगारांनी संप केल्यानंतर त्या कामगारांना परत कामावर बोलाविण्यात आले. महापालिकेचे आयुक्त सिमिंग्टन यांच्याशी वाटाघाटी करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांना दरमहा २८ रुपये पगार मिळवून दिला.

**विडी कामगारांसाठी कार्य :**

स्वतंत्र मजूर पक्षाने वऱ्हाड प्रांतातील विडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. एल.एन.हरदार यांनी १ जानेवारी १९३१ रोजी नागपूरला मध्य प्रांत वऱ्हाड विडी कामगार संघ स्थापन केला. विडी कामगारांचे हक्क व मान वाढविण्यासाठी आणि कायदेशीर उपायांनी त्यांच्या गाऱ्हाण्यांची दाद घेण्यासाठी हरदास, कालीचारण, दामोदरराव, नंदा गवळी, रामचंद्र फुले, सीतलप्रसाद गजभिये यांनी सतत प्रयत्न चालविले होते. १९३२ साली विडी कारखान्यात संबंधीचे विधेयक रामचंद्र फुले यांनी मध्य प्रांताच्या विधीमंडळात मांडले होते. परंतु ते फेटाळण्यात आले. आमदार राघव घोडीचोर यांनी वऱ्हाडाच्या विधानसभेत १९३९ मध्ये विडी कामगारांवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्यासाठी विधेयक मांडले, पण त्याचे ही कायद्यात रुपांतर होवू शकले नाही.[३] दामोधरराव नंदागवळी यांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रांत वऱ्हाड विडी कामगार परिषद भरली होती. तेव्हा विडी कामगारांच्या पुढील मागण्या करण्यात आल्या. त्यामध्ये विड्या बनविण्याचा भाव दर हजारी कमीत कमी आठ आणे शहरात आणि खेड्यात तो भाव सात आणे असावा. पत्ताछाट, बडलछाट, झालछाट आदि छाटीचे सर्व प्रकार पुर्णपणे बंद व्हावे. कामगारांना किमान आठ ते दहा आणे रोज मजूरी मिळाली पाहिजे. बारमाही कामावर असणाऱ्या कामगारांना तंबाखू व पत्ते मिळावे. त्याचबरोबर विड्याचा पत्ता व धागा इत्यादीबद्दल पैसे कापण्याची पद्धत बंद व्हावी, कामगारांना दिवसा दुपारी सक्तीची सुट्टी न देता स्वखुशीने मजूरांना ठरावीक वेळेसाठी बाहेर जाता यावे. अलवाडी बाजाराच्या दिवशी संध्याकाळी पगार व्हावा, कारखान्यात काम करण्याची वेळ सकाळी आठ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत असावी, पत्ताछाट नंतर करण्याऐवजी मालकानीच पत्ते द्यावेत.[४] अशा प्रकारच्या मागण्या मांडण्यात आल्या.

१९३५ च्या कायद्यात समाविष्ट केलेली संघराज्याची योजना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ही फेटाळली होती. १९३५ च्या कायद्यातील फेडरेशनचा भाग जालीम विष समजून फेकून दिला पाहिजे असे मत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केले होते. ३ सप्टेंबर १९३९ रोजी इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युध्द सुरु झाल्याचे जाहीर केले. काँग्रेस व लीग यांनी इंग्रज सरकारला सशर्त सहकार्य देवू केले. तर स्वतंत्र मजूर पक्षाने सरकारशी बिनशर्त सहकार्य करण्याबाबत घोषणा केली. त्यांनी हिंदुस्थानातील खड्या सैन्यात युध्दास लायक व नालायक असा भेदभाव न करता सर्व जातीच्या लोकांना प्रवेश आणि अधिकाऱ्यांच्या जागा मिळाव्या असे सांगितले. मे १९४२ मध्ये सादर झालेली क्रिप्स योजना स्वतंत्र मजूर पक्षाने फेटाळली.

**शेतकऱ्यासाठी केलेले कार्य :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर केवळ कारखान्यात, गिरणीत काम करणाऱ्या कामगारांसाठीच लढा देत होते असे नाही, तर शेतकरी आणि शेतीवर काम करणारे शेतमजूर यांच्यासाठीही ते लढत होते. यावेळी कोकणात अस्तित्वात असलेल्या खोत पद्धतीच्या विरुद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रथम आवाज उठवला. हा खोत म्हणजे गावातला एक लहानसा राजाच असतो. शेतकऱ्याला सरकारचे देणे देऊन शिवाय खोती हक्काबद्दल वेगळे देणे द्यावे लागत होते. अशा रितीने शेतकऱ्यांवर करांचा बोजा वाढला होता. शेतकऱ्याने पैसे भरले असले तरी त्याची रितसर पावती खोताकडून मिळत नसे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात 'कुळांची शेंडी नेहमी खोतांच्या हातात आहे कुळांच्या जे मालकीचे होते किंवा कुळांकडे जे काही असे ते खोताच्या मालकीचे असे खोत हा गावातील सावकार असे'. शेतकऱ्याची पिळवणूक करणे, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळू नये यासाठी तो नेहमी प्रयत्नशील असायचा. खोती म्हणजे शेतकरी वर्गाची गुलामगिरीच होती. याला विरोध करण्यासाठी १४ एप्रिल १९२९ रोजी चिपळूण येथे शेतकरी परिषद भरविण्यात आली. या परिषदेचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. यावेळी परिषदेला संबोधित करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, 'शेतकरी वर्ग आज खोती पद्धतीमुळे गुलामगिरीत खितपत पडला आहे. या अन्यायाच्या चौकटीवर कोणत्याही समाजात स्वास्थ्य राहणार नाही. शांतता टिकवायची असेल तर सरकारने न्याय दिला पाहिजे. कुणबी लोकांनी आपल्या स्वाभिमानाला जागून वरिष्ठ लोकांची कामे करुन स्वतःचा सामाजिक दर्जा मुळीच कमी करुन घेऊ नये. आपल्या गाऱ्हाण्यांची दाद कौन्सिलपर्यंत जाऊन मागता येईल.'[५] या परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली एक ठराव पास करण्यात आला. त्यात खोती पद्धत ही गुलामगिरी आहे. खोतामुळे शेतकरी वर्ग खोताचा गुलाम झाला आहे. आर्थिकदृष्ट्या खोती पद्धत कुळांना घातक आहे. नैतिकदृष्ट्याही खोत पद्धत घातक आहे. अशा या खोती पद्धतीची ही परिषद तीव्र निषेध करते व ती नाहीशी करावी अशी सरकारला आग्रहाची सूचना करते'. या ठरावाची अंमलबजावणी म्हणूनच पुढे १० जानेवारी १९३८ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाने आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली मुंबईत २० हजार शेतकऱ्यांचा मोर्चा विधान मंडळावर नेला. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मागण्या सादर केल्या. त्या अशा होत्या जमीन कसणाऱ्याला त्याच्या मेहनतीचे फळ मिळाले पाहिजे, खोत इनामदारांसारखे मध्यस्थ नको, शेतकऱ्यांवर कर अगर पट्टी बसविण्यापूर्वी त्याला चरितार्थापूरती योग्य सोय कायद्याने करुन दिली पाहिजे, कमी उत्पन्नावर सारा माफ करणे, खोती व इनामदार पद्धती नष्ट करण्यासाठी कायदा करणे, तीन वर्षे जमीन कसणाऱ्या कुळाला कायम कूळ समजले जावे, सर्व खेड्यात चराई राने मोफत असावी, सावकारी व्यवस्थेचे नियंत्रण करणे वेठबिगारी हा फौजदारी गुन्हा ठरविणे अशा मागण्या सादर केल्या. २७ मार्च १९३८ रोजी नायगाव, मुंबई मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली.[६]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीचे त्याचबरोबर अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीबाहेरच्या कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केला. स्वतंत्र मजूर पक्षाने व्यापक भूमिका घेवून अस्पृश्य व इतर समाज घटकांमध्ये समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न केला. कामगारांचे प्रश्न त्याचबरोबर शेतकऱ्यांचे प्रश्न, कुळांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र

मजूर पक्षाच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठे कार्य केले. सावकारी बंधनातून त्याचबरोबर खोती पद्धतीमध्ये जमीनदारांपासून शेतकऱ्यांची सुटका व संरक्षण करण्याचे कार्य या पक्षाने केले. भांडवलदार वर्ग, गिरणी मालक, सरकार यांच्या विरोधात जावून कामगारांच्या हिताचे रक्षण स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. राष्ट्रीय राजकारणात स्वत:ची वेगळी अशी ओळख निर्माण करुन हिंदुस्थानच्या व्हाईसरॉय कार्यकारीणीत पक्षाला प्रतिनिधीत्व मिळवून देण्यात स्वतंत्र मजूर पक्ष यशस्वी झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाचे केवळ शेतकऱ्यांपूरते, कामगारांपूरते क्षेत्र मर्यादित नव्हते. तर अस्पृश्यांच्या हक्कासाठी महार बटालियन निर्माण करण्यात वेळप्रसंगी ब्रिटीश सरकारला विरोध सुध्दा केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, जेव्हा-जेव्हा माझे व्यक्तीगत हितसंबंध आणि संपूर्ण देशाचे संबंध यांच्यामध्ये संघर्ष होण्याचा प्रसंग येईल तेव्हा माझ्या वैयक्तीक हितापेक्षा मी नेहमीच देशहिताला प्राधान्य दिले आहे. स्वतंत्र मजूर पक्षाचे स्वातंत्र्यपूर्व राजकारणातील स्थान खुप महत्त्वाचे होते. श्रमजीवी-कामकरी व शेतकरी वर्गाचे खरे हितरक्षण झाल्याशिवाय हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सुलभतेने सोडविला जाणार नाही असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाचे मत होते.

या काळात हिंदुस्थानमध्ये कॉंग्रेस, हिंदू महासभा, मुस्लीम लीग असे प्रमुख पक्ष अस्तित्वात होते. इतर पक्षांचा जन्म अनेक वर्षापूर्वी झालेला होता आणि प्रत्येक पक्षाच्या ध्येयाची फलश्रूती थोड्या फार प्रमाणात झालेली होती. परंतु स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना १९३६ साली झाली. परंतु १९३९ सालापर्यंत म्हणजेच जवळ-जवळ तीन वर्षामध्येच हा पक्ष सर्व हिंदुस्थानभर पसरला व इतर प्रमुख पक्षामध्ये गणला जाऊ लागला. इतर पक्षाना धनिक, सावकार, भांडवलदार, कारखानदार, काजी, मौलाना, ब्राम्हण वगैरेचा आश्रय होता. परंतु स्वतंत्र मजूर पक्षाला गोरगरीब शेतकरी, कामकरी व दलित अस्पृश्य समाज यांचा आश्रय होता. इतर पक्षामध्ये आपसात अनेक मतभेद होते. परंतु सर्वांनी मिळून स्वतंत्र मजूर पक्षाला विरोध केला. तरी सुध्दा स्वतंत्र मजूर पक्षाची प्रसिध्दी दिवसेंदिसव वाढतच गेली.[७] अस्पृश्य समाजामध्ये जागृती केल्यानंतर राजकारणात प्रवेश मिळविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. या पक्षामार्फत त्यांनी देशातील सर्व जातीच्या, धर्माच्या लोकांना संघटीत करुन त्यांचे हितसंबंध आपल्या राष्ट्रात काय आहेत, कष्ट करुन देशातील मजूर शेतकरी यांचे रक्त आटले आहे. तरी देखील हा एवढा अफाट मोठा समाज उर्जितावस्थेत का येत नाही ही जाणीव सर्वांना करुन देण्यासाठी, देशातील मूठभर भांडवलवाले मजूरांच्या कष्टावर भांडवलदार बनून शेवटी मजूरास सहाय्य करण्याची त्यांची प्रवृत्ती नाही. अशा भांडवल शाहीचे देशातून उच्चाटन करुन देशांतील सर्व सत्ता बहुजन वर्गाच्या ताब्यात देण्यासाठी, भांडवलशाहीचे चोचले पुरविण्यासाठी शेतकरी, कामकरी वर्गावर लादलेला प्रमाणापेक्षा जास्त कराचा भार कमी करण्यासाठी, खोत भांडवलदाराच्या विळख्यात सापडलेल्या शेतकरी कुळांची सुटका करण्यासाठी कारखानदार, व्यापारी यांच्या पिळवणूकीत सापडलेले मजूर, कामगार, शेतकरी यांची पिळवणूक थांबविण्यासाठी कष्टमय जीवन जगणाऱ्या मजूरांची सुटका करण्यासाठी, त्यांना योग्य वेतन मिळवून देण्यासाठी, त्याचबरोबर भांडवलदारांच्या बरोबरीने पददलित वर्गास सर्व अधिकार मिळवून देण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाने मोठा संघर्ष केला. मजूर बांधवाच्या उन्नतीसाठी ज्या-ज्या मार्गांनी करता येईल तो मार्ग मग तो कितीही खडतर, काटेरी असला तरी त्या मार्गावर स्वतंत्र मजूर पक्ष गेल्याशिवाय राहणार नाही हे स्वतंत्र मजूर पक्षाचे ध्येय होते. कामगारांनी जागरुक राहून त्यांनी आपापसात ऐक्य साधून आपली कामगार चळवळ ताकदवान बनवली पाहिजे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. त्याच बरोबर कामगारांनी आपल्या हितासाठी आणि आपल्या संरक्षणासाठी राजकारणात शिरावे, त्याशिवाय कामगारांची सुधारणा शक्य नाही. आणि म्हणून सर्व कामगारांचे ऐक्य व्हावे व त्यांनी देशाच्या राजकारणात भाग घ्यावा असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे म्हणणे होते.

### कामगारांसाठी केलेले कार्य :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्याच्या माध्यमातून आपली कामगार चळवळ राबविली. त्या स्वतंत्र मजूर पक्षाची उद्दिष्टे व धोरणे सर्वसमावेशक होती. ती पुढीलप्रमाणे कामगारांच्या कामाचे तास कमी करुन मजूरीची किमान मर्यादा ठरविणे, कारखान्यातील व गिरण्यातील कामगारांच्या नोकरीची शाश्वती व बढती याबाबत कायदेशीर तरतूद करणे, केलेल्या कामाचे योग्य वेतन दिले जावे, कामगारांना राहण्यासाठी स्वस्त घरे देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन त्यांना आजारी रजा देणे, अपघाती नुकसान भरपाई देऊन वृध्दत्वाची पेन्शनही देणे, कामगारांच्या बालकांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे.

स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली विद्वता, लोकप्रियता, डाव्या विचाराच्या व्यक्तीचे सहकार्य आणि वैचारीक व व्यावहारिक या दोन्ही पातळयांवर या पक्षाने स्वीकारलेली योग्य दिशा या घटकांचे योगदान घडूनही या पक्षाला स्वत:चे अस्तित्व फार काळ टिकवता आले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अल्पावधीतच म्हणजे जेमतेम सहा वर्षामध्येच हा पक्ष बंद केला व नवीन पक्ष शेड्युल्ड कास्टस् फेडरेशन हा स्थापन केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना असे का करावे लागले? याचे उत्तर शोधण्यासाठी आपणास अनेक मुद्दयांचा विचार त्यांची मिमांसा करावी लागेल. तत्कालीन समाजव्यवस्था, जातीप्रथा, उच्च-नीचता, अस्पृश्यता व समाजाचा मागासवर्गीयांकडे बघण्याचा दृष्टीकोन यांचा खुप मोठा परिणाम या पक्षाला भोगावा लागला. त्यामुळे हा पक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अल्पावधीतच विसर्जीत करावा लागला. ऐन निवडणूकांच्या वेळी या पक्षाची स्थापना करण्यात आली होती. सुरुवातीपासूनच विचारप्रणाली व पक्षबांधणी या दोन्हीमध्ये अनेक पेचप्रसंगांना तोंड द्यावे लागले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली धर्मांतराची घोषणा केली आणि १९३६ साली या स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली होती. या दोन्ही घटना वरवर पाहता वेगवेगळ्या जरी दिसत असल्या तर एकामेकावर

परिणाम करणाऱ्या आहेत. भारतीय श्रमिकांमध्ये जातीव्यवस्था खोलवर रुजलेली आहे. त्यामुळे श्रमिक एकत्र येण्यासाठी अडचणी निर्माण होते. त्याचबरोबर अस्पृश्य श्रमिकाला दोन पातळ्यावर म्हणजेच भांडवलदार व स्पृश्य कामगार यांच्याशी लढावे लागत होते. भारतीय श्रमिकांना एकजूट करण्यासाठी त्यांना जातिमुक्त केले पाहिजे, त्याचबरोबर स्पृश्यास्पृश्य कामगारांना एकमेकांपासून दूर ठेवणाऱ्या समजुती, रुढी, परंपरा या नष्ट केल्या पाहिजेत, वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अस्पृश्यता धर्मपुरस्कृत असल्यामुळे धर्मांतराशिवाय यांना नष्ट करता येणार नाही. अशा प्रकारे धर्मांतर ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीने दलित-कष्टकरी जनसामान्यांच्या निधर्मी, समाजवादी व लोकशाही तत्त्वावर आधारीत पक्षनिर्मीतीची महत्त्वाची पूर्व अट होती. ती पूर्ण झाल्यानंतरच स्वतंत्र मजूर पक्षाची संकल्पना प्रत्यक्षात उतरु शकणार होती. धर्मांतरातून अपेक्षित असलेल्या सामाजिक मन्वंतराला आर्थिक-राजकीय संघटनेचा आधार देण्याची प्रक्रिया स्वतंत्र मजूर पक्षाच्या उभारणीतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित होती. परंतु प्रत्यक्षात याचा परिणाम उलटा झाला. उमेदवार निवडीपासूनच धर्मांतराच्या प्रश्नावरुन नवनिर्मित पक्षात ऐकी निर्माण होण्याऐवजी फुटीलाच वाव मिळाला.

स्वतंत्र मजूर पक्षाची समाजवादी विचारप्रणाली आणि तिच्याशी सुसंवादी आर्थिक कार्यक्रमसुध्दा सधन महारश्रेष्ठींचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर रोष होण्यास कारणीभूत ठरला. आर्थिक प्रश्नांवर या पक्षाची भूमिका अमृतराव रणखांबे, रोकडे, प्रभृती या धनिक पुढाऱ्यांना आवडली नव्हती. रणखांबे यांना राखीव जागेऐवजी सर्वसाधारण जागेवर उभारण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आग्रह धरल्यामुळे रणखांबे या पक्षाला कायमचे दुरावले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे तिकीट वाटप करताना तरुण इंग्रजी ज्ञान असलेल्या व्यक्तींना प्रामुख्याने तिकीटे दिली.[८] त्यामुळे अनेक जण तिकीटवाटपातून शिक्षणाच्या किंवा वयाच्या कारणास्तव वगळले गेले. नाराज झालेले लोक पक्ष सोडून गेले. अस्पृश्यतेतर कष्टकरी समाजाचा तर स्वतंत्र मजूर पक्षाला फारसा प्रतिसाद मिळाला नाहीच, पण खुद्द अस्पृश्य समाजातूनही पक्ष सदस्यत्व स्वीकारण्यासाठी मुंबई शहरातूनही फार मोठ्या प्रमाणात लोक पुढे आले नाहीत. धर्मांतरास मान्यता न दिल्याने पक्षाची तिकिटे नाकारली म्हणून महारेतर अस्पृश्य पक्षापासून दूर राहिले. तर महारवतन विधेयक न रुचून काही महारही पक्षावर नाराज झाले. अनुभवी, प्रतिष्ठितपण अशिक्षीत असलेले जुने नेते पक्षावर नाराज झाले, धनिक नेत्यांनी पक्षाच्या समाजवादी कार्यक्रमाची भिती घेतली. सदस्यत्वाबाबत अशी प्रतिकूलता असल्यामुळे पक्षाची आर्थिक स्थितीही हालाखीचीच राहीली. स्वतंत्र मजूर पक्षाचे मुखपत्र 'जनता' साप्ताहिक हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वतः वैयक्तिक खर्चातून चालवित असत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जेमतेम सहा वर्ष हा पक्ष चालविल्यानंतर तो विसर्जीत करावा लागला यास अनेक कारणीभूत अशा घटक व घटना होत्या. असे असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांनी राजकारणात प्रवेश करून स्वतःची उन्नती करावी हा नवा विचार मांडला. स्वंतत्र मजूर पक्षाने अल्पकाळात अनेक कामगार, शेतकरी, गरीब लोकांसाठी त्यांच्या हिताची अनेक कामे केली.

**संदर्भ सूची :-**


१) जनता, २२ ऑक्टोबर १९३८.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड १८, भाग २, पृ.८७,८८, १५ ऑक्टोबर २००२.
३) फडके य. दि., आंबेडकरी चळवळ, पृ.१२६, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १५फेब्रुवारी १९९०.
४) जनता, १ फेब्रुवारी १९४१, पृ. ७
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड १८, भाग १, पृ.१६३,१६४,१६५, १५ ऑक्टोबर २००२.
६) जनता, २ एप्रिल १९३८.
७) जनता, २५ नोव्हेंबर १९३९.
८) जनता, १२ सप्टेंबर १९३६.